महाराष्ट्र शासन

-: प्रेस नोट :-

दिनांक २२/०७/२०२४

**पैशांच्या वादातून अपहरण करण्यात आलेल्या बळीताची पुणे येथून १२ तासांच्या आत सुटका करून ०३ आरोपितांना अटक केलेबाबत....**

---------------------------ooo-------------------------------ooo----------------------

दि. २१/०७/२४ रोजी ०२:०५ वा. मुख्य नियंत्रण कक्षाकडुन संदेश प्राप्त झाला की, चिराबाजार, मुंबई याठिकाणी एक व्यक्तीस चार इसमांनी मारहाण केली आहे आणि त्या इसमाचे अपहरण करून त्यास मोटार कारमध्ये टाकुन घेवुन गेले आहेत. प्राप्त संदेशावरून सदर बळीत इसमाचा मित्र प्रत्यक्षदर्शी साक्षीदार श्री कार्तिक सिंग राठोड यांनी दिलेल्या तक्रारीवरून लो.टि.मार्ग पोलीस ठाणे गु.र.क्र. ५९६/२४, कलम १४०(३), ११५(२), ६१(२), १८९ (२), ३(५)भा. न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

परिमंडळातील अधिकाऱ्यांचे पथक तयार करून व.पो.नि. लो.टि.मार्ग पोलीस ठाणे यांच्या अधिपत्याखाली पो.नि. घाडीगांवकर, स.पो.नि. भंडारे, पोउपनि कांबळे तसेच डी.बी.मार्ग पोलीस ठाण्याचे सपोनि पाटील व पायधुनी पोलीस ठाणे पोउपनि वायाळ असे पथक तयार करून बळीत व पाहिजे आरोपीतांचा शोध काम रवाना केले.

तांत्रिक तपासावरून स.पो.नि. भंडारे, सपोनि पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथक यांनी आरोपींनी वापरलेल्या वाहनांचा माग काढत त्यांच्या कोंढवा, पुणे येथील पत्त्यावर तपासी पथक पोहचले. सदर ठिकाणी त्यांनी अतिश्य कौशल्याने तपास करून सापळा रचुन १२ तासाच्या आत गुन्हयात वापरलेल्या मोटार वाहनासह ०३ आरोपींना अटक करून बळीत इसम नामे हेमंतकुमार रावल, वय ३० वर्षे यांची सुखरूप सुटका केली.

सदर गुन्हयात तपासादरम्यान आणखी ३ आरोपींचा सहभाग निष्पन्न झालेला असून, त्यांचा शोध घेण्यात येत आहे.

नमूद घटनेची माहिती मिळताच तात्काळ परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन गुन्हयाचे तपासाकरीता वेगवेगळे पोलीस पथक तयार केली व मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लो. टि. मार्ग पोलीस ठाणे, मुंबई यांनी पोलीस ठाणेचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मदतीने आरोपीतास तात्काळ अटक केलेली आहे.

सदर गुन्हयाच्या तपासात मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई डॉ. अभिनव देशमुख, मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २, मुंबई, डॉ. मोहितकुमार गर्ग यांचे मोलाचे मार्गदर्शन व पाठपुरावा केल्याने उघडकीस आलेला असून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, लोकमान्य टिळक मार्ग पोलीस ठाणे, मुंबई श्री ज्ञानेश्वर वाघ यांचे नेतृत्वाखाली पोलीस निरीक्षक श्री बाळकृष्ण घाडीगांवकर, सपोनि राहुल भंडारे, सपोनि विकास पाटील, पोउपनि कांबळे, पोउपनि गायकवाड, पोउपनि वायाळ, पो.ह.क्र. ०१.१६४/परूळेकर, पो.ह.क्र. ०३०५०५/ मुन्ना सिंग, पो.ह.क्र. ०४५९७ / सानप, पो.ह.क्र. ९६०००३/तळेकर, पो.शि.क्र. ०७१२१७/वाकचौरे, पो.शि.क्र.०९०४५३/वाकसे, पो.शि.क्र.१३०४६६/जोशी, पो.शि.क्र.१३०४२७/ शिंदे, पो.शि.क्र. १४००४१/भामरे यांनी उघडकीस आणलेला आहे.

Scanned with CamScanner